नि.फौ.प्र. क्र. –३०३०१४७/२००२
शासन वि.  सुनिल व इतर
**<u>नि.क्र. ३८०३</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे  साक्षीदार क्रमांक ०७ चा शपथेवर सरतपास (आरोपी क्र.३ साठी)</u>**

माझे नाव – शंकर भदूजी रंधये,
वय  – ६५  वर्ष, व्यवसाय – सेवानिवृत्त्.
राहणार – फ्लॉवर व्हॅली काम्प्लेक्स, मेरी गोल्ड बिल्डींग, सदनिका क्र.५०४,
खडकपाडा सर्कल, कल्याण पश्चीम

**<u>सरतपास – अभियोगपक्षा तर्फे विशेष सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.सी.चावरिया यांच्या मार्फत –</u>**

१.      मी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई येथे सन १९९० ते २०१८ पर्यंत उप मुख्य अधिकारी म्हणून कार्यरत होतो. किशोर जाधव व शिवसींग बिघोत यांना मी ओळखतो कारण ते माझ्याच विभागामध्ये अधिकारी म्हणून कार्यरत होते.

२.      दि.३०.०५.२००२ रोजी गुन्हे शाखेचे पोलीस महाराष्ट्र राज्य सहकारी मुंबई येथे आले होते. त्यांना होम ट्रेड लि. मुंबई या कंपनीचे ३० ते ३५ धनादेश, ठराव, खाते उघडण्याचा फॉर्म इत्यादी दस्तावेज जप्त करावयाचे होते. आमचे वरिष्ठ अधिकारी यांनी मला व किशोर जाधव यांना पंच म्हणून हजर राहण्यास सांगीतले होते. सदरचे धनादेश व दस्तावेज हे शिवसींग बिघोत यांच्या ताब्यातून जप्त करावयाचे होते. सदरचे धनादेश व दस्तावेज पोलीसांनी आमच्या बँकेच्या मुख्यालयातून माझ्या व किशोर जाधव यांच्यासमक्ष पंचनाम्याखाली जप्त केले. सदरचा पंचनामा पोलीसांनी आमच्या समक्ष तयार केला होता. आता साक्षीदारास नि.क्र.१३७०/१ वरील जप्तीपंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यावर अनु क्रमांक २ वर किशोर जाधव यांची सही आहे. तसेच त्यावर शिवसींग बिघोत यांची सही आहे. सदर पंचनाम्याची एक प्रत शिवसींग बिघोत यांना दिलेबाबत त्यावर त्यांची

सही आहे. सदर पंचनाम्यास **निशानी क्र.१३७०/१/अ–३** देण्यात येते.

३. आता साक्षीदारास नि.क्र.१३७०/२ ते १३७०/४० वरील दस्तावेज दाखविण्यात आले. सदरचे दस्तावेज वर नमुद पंचनाम्याखाली त्यांच्यासमक्ष जप्त केल्याचे साक्षीदार सांगत आहेत. सदर दस्तावेज यांना अनुक्रमे **निशानी क्र.१३७०/२/अ–३** ते **निशानी क्र.१३७०/४०/अ–३** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**Order** –Shri Pankaj Tamboli, the Ld. Advocate for accused No.3 is present before the Court. Accused No.3 is absent. By filing pursis Exh.3805, accused No.3 has informed this Court to decide the application Exh.3801. The application Exh.3801 was filed on 12.03.2026. The Ld. APP has not yet filed say on the said application. The witness is a senior citizen and has traveled all the way from Kalyan for the purpose of giving evidence. The charge against accused No.3 was framed on 26.11.2025. The accused was well aware of the issuance of witness summons to the above named witness. The evidence of said witness is in respect of documents which are part and parcel of the chargesheet. Thus, the cross-examination can not be deferred for the purpose of deciding application Exh.3801. The matter is time bound. It is evident that, the accused is delaying the proceeding. Hence, the cross-examination is closed in view of the proviso (c) of Section 309(2) of the Code of Criminal Procedure.

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत

MAHESH VIJAYKUMAR PHADE

Digitally signed by MAHESH VIJAYKUMAR PHADE
Date: 2026.03.23 16:27:38 +0530

(एम.व्ही.फडे)

दिनांक – २३.०३.२०२६

२रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,

नागपूर